I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 : 142-145 e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
A Double-Blind Peer Reviewed Journal OPEN ACCESS Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# कोविड–१९ काळातील सार्वजानिक वितरण प्रणालीची भुमिका

गणेश म. दोनाडकर व प्रा. डॉ. राजु ल. आदे

उच्च शिक्षण व संशोधन केंद्र, अर्थशास्त्र विभाग प्रमुख
ने. हि. महाविद्यालय ब्रम्हपुरी, जि. चंद्रपुर
Corresponding Author : donadkar3@gmail.com

Communicated :20.03.2022 Revision : 27.03.2022 Accepted :30.03.2022 Published: 02.05.2022

**सारांश :**

कोविड–१९ या जागतिक माहामारीमुळे संपुर्ण जग थाबले आहे. जगातील प्रत्येक नागरीक हया माहामारीला बळी पडला आहे. लॉकडाऊनच्या काळात देशातील नागरीक, कामगार, शेतकरी व शेतमजुर यांच्या हातातील काम गेल्याने उपासमारीची परिस्थिती निर्माण झाली. या संकटाच्याकाळात देशातील सार्वजानिक वितरण प्रणालीने अंत्यत मोलाची भुमीका बजावली असुन अनेक समस्यांना तोंड देत विक्रमी अन्यधान्य साठा हा प्रत्येक लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्याचे आव्हान पेलले आहे. प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेची घोषणा केंद्रशासनाकडून करण्यात आली. सुरवातीला एप्रिल ते नोंव्हेबर २०२० कालावधी ठरविण्यात आला होता. त्यानंतर या योजनेचा विस्तार करण्यात आला. सार्वजानिक वितरण प्रणाली हि अंत्यत कठीण काळामध्ये आतापर्यंत अंत्यत प्रभावीपणे कार्य करीत आली आहे. त्यामुळे याच दृष्टीकोनातुन सार्वजानिक वितरण प्रणालीची कोंविड–१९ काळातील भुमिका यावर चर्चा या शोधनिबंधातुन करण्यात आली आहे.

**बीजशब्द :** कोविड–१९, सार्वजानिक वितरण प्रणाली, अन्न सुरक्षा, प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना.

**प्रस्तावना :**

नृपाय बुभुक्षिताया: प्रजाया: मृत्यु
महत्पाप वर्तते (चाणाक्य निती दर्पण)

राज्याचा सर्वात मोठा जर कोणता अपराध असेल तर त्याच्या प्रजेचा अन्नावाचुन मुत्यृ किंवा भुकबळी होय. असे विवेचन चाणाक्य यांनी केले आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर इंग्रजांची झालेली प्रशासकीय वाताहत व आर्थीक स्थिती यातुन त्यांना भारतातील स्थिती मजबुत करणे आवश्यक वाटले होते. त्यासाठी त्यांनी भारतात १९४० मध्ये बंगालमध्ये पडलेल्या दुष्काळाचा सामना करण्यासाठी उपयोजलेली सार्वजानिक वितरण प्रणलीला पुर्नरचित करण्याचे ठरविले. स्वातंत्र प्राप्तीनंतर देशात आलेल्या अनेक दुष्काळ व नैसर्गीक आपत्तीचा सामना करतांना सार्वजानिक वितरण प्रणालीची भुमीका महत्वाची ठरली आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेत या प्रणालीवर विशेष भर देण्यात आला होता. त्यानंतर आजतागायत देशातील प्रत्येक आपत्तीचा सामना करतांना सार्वजानिक वितरण प्रणलीची अग्रक्रम भुमिका आहे.

कोविड–१९ या जागतिक महामारीच्या काळात केंद्रसरकारने प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजने अंतर्गत सार्वजानिक वितरण प्रणालीव्दारे प्रति सदस्य ५ किलो अन्नधान्य प्रति माह वितरीत करण्यात आले. या पार्श्वभुमीवर कोंविड–१९ या जागतिक महामारीच्या काळातील आपत्ती निवारण कार्यात सार्वजानिक वितरण प्रणालीची भुमिका यावर विश्लेषण करण्याची नितांत गरज आहे.

**संशोधनाची गरज–**

स्वातंत्र्यापुर्वी व स्वातंत्र्यानंतरही सार्वजानिक वितरण प्रणाली ही देशातील उपेक्षितांना रास्तदरामध्ये अन्नधान्य पुरविण्याचे कार्य शासनामार्फत करते. भुक संपविणे व देशातील प्रत्येकाला अन्न सुरक्षा प्रदान करुन देशाला संक्षम व सुदृढ करुन शाश्वत शेतीस प्रोत्साहन देणे हे एक शाश्वत विकासापैकी महत्वाचे ध्येय आहे. म्हणुनच या ध्येयप्रति मार्गक्रमन करीत असतांना सार्वजानिक वितरण प्रणालीच्या कामाचे अध्ययन करुन त्यावर संशोधन करणे गरजेचे आहे. कोविड–१९ मुळे संपुर्ण देशाला आर्थीक संकटाला सामोरे जावे लागले. हयातुन बेरोजगारी, उपासमार, भुकबळी यासारख्या संकटाशी सामना करतांना केंदशासनाने प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेची घोषणा केली. या योजनेची अमलबजावनी सार्वजानिक वितरण प्रणाली अंर्गत करण्यात आली. त्याचबरोबर केंद्रशासनाची महत्वपुर्ण अन्नसुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत धान्यवाटप सुद्धा या प्रणाली मार्फत करण्यात आले. त्यामुळे कोविड–१९ च्य काळातील सार्वजानिक वितरण प्रणालीच्या दुहेरी भुमिकेचे अध्ययन करुन त्यावर संशोधन करण्याची गरज आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे –**

सार्वजानिक वितरण प्रणाली हि देशातील सर्वात मोठी यंत्रणा मानली जाते. भारतातील सर्व स्तरामध्ये या

प्रणालीचा विस्तार झाला आहे. अंत्यत कठीण परिस्थितीत तेवढयाच प्रभवीपणे सार्वजानिक वितरण प्रणाली हि कार्य करते त्यामुळे याप्रणालीचे कार्यपध्दती रचना यांचा अभ्यास करण्याकरिता प्रस्तुत शोधनिबंधाव्दारे अध्ययन करण्यात आले आहे.

कोविड—१९ च्या काळातील सार्वजानिक वितरण प्रणालीची भुमिका याचे अध्ययन करतांना काही महत्वाची उद्दिष्टे ठेवुन शोधनिबंधाची रचना करण्यात आली आहे.

१) सार्वजानिक वितरण प्रणालीची अभ्यास करणे.

२) सार्वजानिक वितरण प्रणालीच्या कार्यपध्दतीचा अभ्यास करणे.

३) आपतकालीन परिस्थितीत सार्वजानिक वितरण प्रणालीच्या कार्याचे अध्ययन करणे.

४) कोविड—१९ च्या काळातील सार्वजानिक वितरण प्रणालीची भुमिका याचे अध्ययन करणे.

५) प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेच्या अंमलबजावणीत सार्वजानिक वितरण प्रणालीची भुमिका याचे अध्ययन करणे.

**संशोधनाची गृहीते—**

प्रस्तुत शोधनिबंधाचे अध्ययन करतांना काही गृहित निश्चित करण्यात आली आहेत.

१) देशातील सार्वजानिक वितरण प्रणाली सक्षमरित्या कार्य करित आहे.

२) सार्वजानिक वितरण प्रणालीचा आपत्ती व्यवस्थापनात मोलाचा वाटा आहे.

३) प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेची सार्वजानिक वितरण प्रणालीव्दारे यशस्वी अंमलबजावणी करण्यात आली.

**संशोधन पध्दती—**

''कोविड—१९ काळातील सार्वजानिक वितरण प्रणालीची भुमिका'' या शोधनिबंधातील आवश्यक माहीती संकलीत करतांना माहीती संकलनाच्या दृय्यम स्त्रोतांचा आधार घेण्यात आला. यामध्ये ग्रंथ, पुस्तके, मासीके, वार्षिक अहवाल, संशोधन साहित्य, वृत्तपत्रे, साप्ताहिके व अन्य लिखित माहीतीचा उपयोग करण्यात आला.

**सार्वजानिक वितरण प्रणालीची पार्श्वभुमी—**

भुक संपविने, देशातील प्रत्येक नागरिकाला अन्न सुरक्षा प्रदान करुन देणे हे देशातील सरकारचे कार्य आहे. देशातील प्रत्येक नागरीक हा सृदृढ असावा, देशातील प्रत्येक नागरीकास पोटभर अन्न व सुदृढ आरोग्य प्राप्त करुन देण्याची जबाबदारी सरकारची आहे आणि हे उद्दिष्टये साध्य करतांना सार्वजानिक वितरण प्रणालीचा मोलाचा वाटा आहे.

सार्वजानिक वितरण प्रणालीचा सुरवात बंगालमधील दुष्काळ निवारण्यासाठी केलेल्या उपाययोजना यामधुन झाली. त्यानंतर देशामध्ये येणाऱ्या दुष्काळाचा सामना करण्यासाठी याप्रणालीची गरज निर्माण झाली. १४ जानेवारी १९४५ पासुन सार्वजानिक वितरण प्रणालीची सुरवात झाली. त्यानंतर या प्रणालीचा विस्तार संपुर्ण भारतभर करण्यात आला.

**सार्वजानिक वितरण प्रणालीची संकल्पना व व्याप्ती—**

सार्वजानिक वितरण प्रणाली म्हणजेच उपेक्षितांना व गरजवंताना वस्तु व सेवांचे रास्त दरामध्ये वितरण करणारी प्रणाली होय. या प्रणाली अंतर्गत बाजारपेठेतील कच्चा माल ने—आण करण्यापासुन ते पक्यामालात रुपांतर झाल्यानंतर ते लाभार्थ्यापर्यंत पोहचविण्याच्या क्रियांचा अंर्तभाव होतो. सार्वजानिक वितरण प्रणाली अंतर्गत उपभोगत्याला मापक दरामध्ये जिवनावश्यक अनिवार्य वस्तुंचा पुरवठा केला जातो. त्याचे नियतन केद्र सरकारव्दारे केले जाते. तर ते निरंतर व योग्यवेळी लाभार्थ्यांना उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी राज्यशासनाची आहे. सार्वजानिक वितरण प्रणालीचे कार्यप्रवन राज्यसरकार व केंद्रसरकार संयुक्तरित्या करते वस्तुचे खरेदीप्रमाण, साठवणुक नियंत्रण, वाहतुक हि सर्व जबाबदारी केद्रशासनाची असते तर सार्वजानिक वितरण प्रणालीच्या माध्यमातुन स्वस्त धान्य दुकानांमार्फत लाभार्थ्यांपर्यंत वस्तु पोहचविने, लाभार्थ्यी निश्चित करणे, शिधा पत्रिका वाटप करणे, स्वस्त धान्य दुकांनांना परवानगी देणे, त्याचे पर्यवेक्षण करणे हि जबाबदारी राज्यशासनाची असते.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत ८९.३३ करोड नागरीक अन्नधान्य प्राप्त करीत आहेत यामध्ये कुटुंब लाभार्थ्यांचे तिन प्रकारात वर्गीकरण करण्यात आले आहे ते खालील प्रमाणे.

१) अंतोदय योजना लाभार्थी.

२) प्राधान्य कुटुंब लाभार्थी.

३) दारिद्रय रेषेवरील कुटुंब लाभार्थी.

भारतीय अन्न निगम यांच्या २०२०—२०२१ च्या अहवालानुसार भारतात ५.३४ लाख स्वस्तधान्य दुकानांच्या माध्यमातुन २३.४० करोड कार्ड धारकांना लक्षीत सार्वजानिक वितरण प्रणालीच्या मार्फत मुलभुत वस्तुंचा पुरवठा केला जात आहे. त्यावस्तुमध्ये गहु, तांदुळ, साखर या प्रमुख वस्तुंचा समावेश होतो. ५.३४ लाख स्वस्तधान्य दुकांनापैकी ४.६७ लाख स्वस्तधान्य दुकानांच्या माध्यमातुन इलेक्ट्रीक पॉईंट ऑफ सेल (POS) यंत्राव्दारे बायोमॅट्रिक प्रमाणिकरण करुन धान्यवाटप केले जाते.

कोविड–१९ काळातील सार्वजानिक वितरण प्रणालीचे कार्य–

**TDPS व राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम –**

अन्नसुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत भारतीय अन्ननिगम वार्षिक अहवाल २०२०–२०२१ नुसार जवळपास ८० करोड लोकांना अन्नाचा अधिकार प्राप्त करुन देण्यात आला. यामध्ये तांदुळ ३ रूपये किलो, गहु २ रूपये किलो आणि मोठा अनाज १ रूपये किलो दराने लक्षीत जनतेला सार्वजनिक वितरण प्रणालीच्या माध्यमातुन वितरित करण्यात येत आहे.

वित्तीय वर्ष २०१९/२०२० करीता ज्क्च्ै तथा अन्य कल्याणकारी योजनांसाठी एकुण ६०३.९५ लाख टन धान्याचे प्रस्तावित आवंटन केले होते. त्यापैकी राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमांतर्गत ४२६.४३ लाख टन धान्याची उचल करण्यात आली होती. तसेच नैसार्गिक आपत्ती व दुष्काळ निवारण योजनांसाठी २.२५ लाख टनाची उचल करण्यात आली.

वित्तीय वर्ष २०२०/२०२१ करीता ज्क्च्ै तथा अन्य कल्याणकारी योजनांसाठी एकुण ९४३.५३ लाख टन धान्याचे प्रस्तावित आवंटन केले होते. त्यापैकी ७५९.२६ लाख टन उचल करण्यात आली होती. त्यामध्ये ज्क्च्ै राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनिमाअंतर्गत ५९८.४१ लाख टन धान्याची उचल करण्यात आली होती. तसेच नैसार्गिक आपत्ती व दुष्काळ निवारण योजनांसाठी आवंटीत असलेल्या ३४२.३३ धान्यापैकी ३१७.१२ लाख टन धान्याची उचल करण्यात आली.

**प्रधानमंत्री गरिब कल्याण अन्न योजना –**

कोविड:१९ या जागतिक महामारीमुळे संपुर्ण जगाला आर्थिक संकटाला सामोर जावे लागले.त्या काळामध्ये लोकांचा रोजगार संपुष्ठात आला,देशातील लोकांना अन्नाची व अन्नसुरक्षेची समस्या निर्माण झाली. पोषणाची अडचण व उपासमारीची स्थिती निर्माण होऊ नये आणि याकाळात पाहीजे त्या प्रमाणात,योग्यवेळी गरजु व उपेक्षीत लोकांना तात्काळ अन्ना मिळावे म्हणुन प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेची घोषणा केंद्र शासनाकडुन करण्यात आली.प्रचलीत असलेली अंतोदय योजना,प्राधान्य कुटुंब लाभार्थी तसेच दारिद्र रेषवरील लोकांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमांतर्गत देय असलेल्या अन्नधान्या व्यतीरिक्त प्रति सदस्य ५ किलो अन्नधान्य व प्रति कुटुंब १ किला डाळ प्रति माह,मोफत वितरित करण्यात आला.

प्रधानमंत्र गरिब कल्याण अन्न योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना सुरूवातीला एप्रील ते नोव्हेंबर २०२० या कालावधीत अन्नधान्याचे मोफत वाटप करण्यात आले. त्यानंतर मे ते नोव्हेंबर २०२१ या कालावधीत अन्नधान्याचे मोफत वितरण करण्यात आले आणि नंतर डिसेंबर २०२१ ते मार्च २०२२ या कालावधीसाठी प्रधानमंत्री गरिब कल्याण अन्न योजनेचा कालावधी निश्चीत करून योजनेची व्याप्ती वाढविण्यात आली.

कोविड़ – १९ या संकट काळामध्ये भातीय अन्न निगम विभागाअंतर्गत विविध कल्याणकारी योजनांसाठी ९४३.५३ लाख टन धान्याचे प्रावधान केले होते. त्यापैकी ७५९.२६ लाख टन धान्याची उचल राज्य व केंद्रशासीत प्रदेशांकडुन करण्यात आली. यामध्ये लक्षीत सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत ४०७.२७ नैसर्गिक आपत्ती निवारण योजना यासाठी ३१७.१२ लाख टन धान्याची उचल करण्यात आली. नैसर्गिक आपत्ती निवारण योजनांसाठी उचल करण्यात आलेल्या एकुण ३१७.१२ लाख टन अन्नधान्यापैकी ३१५.१६ लाख टन अन्नधान्याची उचल प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना व इतर कोविड आपत्ती निवारण योजनांसाठी करण्यात आली होती. भारतीय खादयनिगम यांच्या २०२०–२०२१ च्या वार्षीक अहवालानुसार ५.३५ लाख स्वस्तधान्य दुकानांच्या माध्यमातुन प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेची अमलबजावणी करतांना सार्वजनिक वितरण प्रणालीव्दारे मोफत अन्नधान्याचे वितरण करण्यात आले.लाभार्थ्यांना ५ किलो प्रति व्यक्ती प्रति महा यादराणे २०७.६६ लाख टन तांदुळ व १०७.५० लाख टन गव्हाचे मोफत वाटप करण्यात आले.

**आत्मनिर्भर भारत योजना–**

माननिय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी १२ मे २०२० रोजी देशात विविध ठीकाणी अडकलेल्या प्रवास्यांसाठी तसेच विनाशिधाप्रत्रीका धारकांसाठी त्याचप्रमाणे अन्य गरजवंतासाठी आत्मनिर्भर भारत योजनेअंतर्गत प्रति माह,प्रति व्यक्ती ५ किलो धान्याचे मोफत वितरण सार्वजनिक वितरण प्रणालीव्दारे करण्यात आले.या योजनेअंतर्गत देशातील २.८ करोड प्रवासी व २.७४ करोड गरजु व्यक्तींना (९८:) राशन प्राप्त झाला आहे.

**निष्कर्ष–**

कोविड–१९ च्या काळातील परस्थितीचा आढावा घेऊन व माहितीचे संकलन करून त्या माहितीचे विश्लेषन केल्यानंतर खालील निष्कर्ष निघतात.

१. भारतीय लक्षीत सार्वजनिक वितरण प्रणालि हि ब्रिटिश काळापासुन ते आजपर्यंत अंत्यंत प्रभाविपणे कार्य करीत असल्याचे दिसुन येते ही प्रणाली देशातीलच नव्हे तर जगातील सर्वात मोठी प्रणाली मानली जाते.आपत्तीजन्य परस्थितीमध्ये ही प्रणाली महत्वाची भुमिका बजावत

असल्याचे दिसुन येते. १९४३ च्या सुमारास तेरा शहरांनमध्ये स्वस्तधान्य दुकाने असलेल्या या प्रणालीचे जाळे आता संपुर्ण भारतात पसरलेले असुन देशात ५.३४ लाख स्वस्तधान्य दुकानांच्या माध्यमातुन ही प्रणाली कार्य करित आहे. सार्वजनिक वितरण प्रणाली केंद्र सरकारच्या अखत्यारीत राज्य सरकारच्या नियंत्रणाखाली सक्षमरित्या कार्य करीत असल्याचे दिसुन येते.

२. ब्रिटिश काळापासुन असलेली अन्नधान्याची वितरण प्रणाली म्हणजेच आताची लक्षीत सार्वजनिक वितरण प्रणाली जागतिकरणोत्तर संगणक युगातही गरजेची आहे असे निदर्शनास येते, सार्वजनिक वितरण प्रणालीची सुरूवात ही बंगालमध्ये पडलेल्या दुष्काळातुन झाली. स्वातंत्र्यानंतर आलेल्या अनेक दुष्काळावर मात करण्याची ताकत या प्रणालीमध्ये असल्याचे दिसुन येते. यामध्ये १९७२, १९८७—८८, १९९८ यासारख्या प्रभावी दुष्काळाच्या काळात दुष्काळ निवारनात सार्वजनिक वितरण प्रणालीची अग्रक्रम भुमिका असल्याचे अभ्यासातुन स्पष्ट होते.

३. जगामध्ये कोविड—१९ महामारीने थैमान घातले असतांना देशातील जनतेला रोजगारापासुन मुकावे लागले होते, परिणामी लोकांसमोर अन्नाचा प्रश्न निर्माण होऊ नेये म्हणुन केंद्र सरकारणे प्रधानमंत्री गरिब कल्याण अन्न योजनेची घोषणा केली. या योजनेची अमलबजावनी सार्वजनिक वितरण प्रणालीव्दारे यशस्वीपणे करण्यात आली. केंद्र सरकार कडुन २०२०—२०२१ या वर्षात २०१९—२०२० या वर्षाच्या तुलनेत आपत्ती व्यावस्थापनासाठी अन्नधान्यात १५२००ः वाढ करण्यात आली. सार्वजनिक वितरण प्रणालीव्दारे उचल केलेल्या धान्यापैकी ९३ ते ९४ः धान्याचे यशस्वीपणे वितरण केल्याचे दिसुन येते, आत्मनिर्भर भारत योजनेअंतर्गत जवळपास ९८ः बाहेर अडकलेल्या प्रवाशांना मोफत अन्नधान्याचा पुरवठा व केद्र सरकारकाडुन पुरविलेला अख्खा चना व चना डाळीचे ३४ लाख कुटुंबियांना या प्रणालीमार्फत यशस्वीपणे वितरीत केल्याचे निदर्शनास येते. राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमाअंतर्गत व इतर योजनांची अमलबजावनी सार्वजनिक वितरण प्रणालीव्दारे करीत असतांनासुध्दा कोविड—१९ च्या काळातील योजनांची यशस्वीरित्या अमलबजावनी या प्रणालीव्दारे झाल्याचे अभ्यासातुन स्पष्ट होते.

४. साथीच्या रोगाचा उद्रेक झाल्यापासुन जवळपास ९७ः कुटुंबांच्या उत्पन्नावर प्रभाव पडला असे मत ब्डप् चे ब्म्व महेश व्यास यांनी मांडले. त्यामुळे देशात उपासमार व पोषणाची समस्या निर्मान होण्याची दाट शक्यता होती. परंतु केंद्र शासनाकडुन प्रधानमंत्री गरिब कल्याण अन्न योजनेची घोषना करण्यात आली. या योजनेअंतर्गत सार्वजनिक वितरण प्रणालीव्दारे मोफत धान्य वाटप करण्यात आले. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत येणाऱ्या व अन्य कल्याणकारी योजनाअंतर्गत सार्वजनिक वितरण प्रणालीव्दारे धान्य वाटप करण्यात आले व त्याच बरोबर प्रधानमंत्री गरिब कल्याण अन्न योजनेअंतर्गत मोफत धान्याचे वाटप या प्रणालीव्दारे करण्यात आले. कोविड—१९ च्या काळात तीन टप्यामध्ये १८ महिन्याकरिता मोफत अन्नधान्य वाटप करण्यात आले. प्रधानमंत्री गरिब कल्याण अन्न योजनेअंतर्गत मोफत धान्याचे वाटप केल्याने अन्नाचा पोषनाचा प्रश्न निर्माण झाला नाही, असे अभ्यासाअंती निदर्शनास येते. आर्थिक वर्ष २०१९—२०२० च्या तुलनेत आर्थिक वर्ष २०२०—२०२१ मध्ये ३४०.१९ लाखा टन धान्याची वाढ करण्यात आली. माहितीच्या विश्लेषनातुन कोविड—१९ या संकटकाळात लोकांची गरज पुर्ण झाली असे अभ्यासातुन स्पष्ट होते.

कोविड—१९ च्या काळात प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना, अन्न सुरक्षा योजना, आत्मनिर्भर भारत योजना व अन्य कल्याणकारी योजना यांच्या माध्यमातुन अन्नधान्य पुरविल्याने लोकांचा रोजगार गेला असला तरी लोकांना अन्नसुरक्षा मिळाली असे अभ्यासातुन निदर्शनास येते.

**संदर्भ :**

आगलावे प्रदिप, संशोधन पध्दती व तंत्र, विद्या प्रकाशन नागपुर (२०००)

घाटगे, वावरे, कृषी व ग्रामीण अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन पुणे (२०१२)

दास संदिप, सार्वजानिक वितरण यंत्रणा , योजना मासिक (२०१०)

डॉ. वावरे, डॉ. सुतार, कोरोनायन एज्युकेशन पब्लिकेशन दिल्ली (२०२१)

PIB मुंबई (२४ नोव्हेंबर २०२१)

लोकराज्य (जुन २०२०)

भारतीय अन्ननिगम अहवाल (२०१९—२०२०)

भारतीय अन्ननिगम अहवाल (२०२०—२०२१)

महाराष्ट्राची आर्थिक पाहणी (२०२०—२०२१)

लोकसत्ता (एप्रिल ३०, २०१४)

Times of India (जुन ९, २०११)